# बृहन्मुंबई महानगरपालिका
# बा.य.ल. धर्मादाय रूग्णालय

**बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालयातील किरणोत्सार सहाय्यक पद नियमित तत्वावर भरण्यासाठी जाहिरात.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील बा.य.ल. नायर धर्मादाय रूग्णालयाच्या आस्थापनेवरील `किरणोत्सार सहाय्यक' या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेले रिक्त पद नियमित तत्वावर भरण्यासाठी विहित अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्ज स्विकारण्याचे ठिकाण : अधिष्ठाता, बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय व टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय, आवक-जावक विभाग, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई 400 008

अर्ज स्विकारण्याचा दिनांक- 27.04.2017 ते 11.05.2017

वेळ संकाळी- 11.00 ते दुपारी - 3.00 वाजेपर्यंत दुसरा व चौथा शनिवार, रविवार आणि सर्व सार्वजनिक सुट्टया वगळून

विहित तारीख व वेळेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबतीत कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही.

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पद | प्रवर्ग निहाय आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| 1 | किरणोत्सार सहाय्यक | 1 | निरंक | | | | | | | | |

## पदाचे नाव - किरणोत्सार सहाय्यक :

### शैक्षणिक अर्हता :

1) उमेदवार मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची विज्ञान शाखेतील (भौतिकशास्त्रासह) उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (H.S.C) उत्तीर्ण असावा.

आणि

2) किरणोत्सार तंत्रज्ञान विषयक दोन वर्षाची पदविका (Diploma in Radiation Techniques) धारण करणारा असावा.
3) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम किंवा उच्च परिक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
4) उमेदवारास डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (`ओ' स्तर) किंवा (`ए' स्तर) किंवा (`बी' स्तर) किंवा (`सी' स्तर ) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/ वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/ तिने शासनाने विहित केलेली `एमएससीआयटी'ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.
5) उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

वयोमर्यादा : दिनांक- 27.04.2017 रोजी खुल्या प्रवर्गासाठी 18 ते 38 वर्षापर्यंत व मागासवर्गीय उमेदवारांसाठी 18 ते 43 वर्षापर्यंत. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असल्यास उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा नाही.

**वेतनश्रेणी : रू. 5200 – 20200 अधिक श्रेणी वेतन रू. 1950 / -**

निवडीचे निकष व कार्यपद्धती :

1) किरणोत्सार सहाय्यक या पदाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार किरणोत्सार तंत्रज्ञान या विषयातील पदविका परिक्षेच्या अंतिम वर्षात मागासवर्गीय उमेदवारांसाठी 50% किंवा त्यापेक्षा अधिक गुण आणि खुला प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी 55% किंवा त्यापेक्षा अधिक गुण धारण करणा-या उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल.

खालीलप्रमाणे प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

1) शैक्षणिक अर्हता – एकूण गुण- **40**

| अनु. क्र. | किरणोत्सार तंत्रज्ञान पदविका अंतिम वर्षाच्या परीक्षेतील एकूण गुण | मागास प्रवर्गाकरिता | खुला प्रवर्गाकरिता | एकूण गुण 40 |
|---|---|---|---|---|
| | | 50 % किंवा अधिक | 55 % किंवा अधिक | 20 |
| | | 60 % किंवा अधिक | 65 % किंवा अधिक | अतिरिक्त 10 गुण |
| | | 70 % किंवा अधिक | 75 % किंवा अधिक | अतिरिक्त 10 गुण |

ब) अनुभव - एकूण गुण- **20**

या क्षेत्रात काम करण्याचा 5 वर्षांचा अनुभव - 5 गुण

5 वर्षापेक्षा अधिक अनुभवासाठी अतिरिक्त - 5 गुण

लिनिअर एक्सिलेटर यंत्रावर काम केल्याचा अनुभव - 5 गुण

अर्जदार टाटा रूग्णालयांतून 2 वर्षे किंवा अधिक वर्षे प्रशिक्षण घेतलेले असल्यास - 5 गुण

(उपरोक्त सर्व अनुभवांबाबत प्रमाणपत्र आवश्यक आहे.)

क) व्यवसाय चाचणी- एकूण गुण- **40**

उमेदवाराने अर्जासह सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्राच्या आधारे शैक्षणिक अर्हतेचे 40 गुण व अनुभवाचे 20 गुण अशा एकूण 60 गुणापैकी उमेदवारास मिळालेल्या एकूण गुणांप्रमाणे उच्च गुणवत्ताधारक पात्र उमेदवारांची व्यवसाय चाचणी घेण्यात येईल.

शैक्षणिक अर्हतेचे 40 गुण अधिक अनुभवाचे 20 गुण अधिक व्यवसाय चाचणीचे 40 गुण अशा एकूण 100 गुणांपैकी उमेदवाराने मिळवलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

व्यवसाय चाचणी घेण्याकरिता नावे, दिनांक व वेळ स्थानिक सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

समान गुण धारण करणा-या अर्हताधारक उमेदवारांना जन्म तारखेनुसार वयोज्येष्ठतेने प्राधान्य देण्यात येईल.

सर्वसाधारण अटी :

1) रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूक करण्यात येईल. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळी पुर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

2) जाहिरातीमध्ये दिलेल्या रिक्त पदांची संख्या आणि अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.

3) वैयक्तिक माहितीपत्र (Bio-Data) विहीत नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने परिपूर्ण असावे. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण वैयक्तिक माहितीपत्र विचारात घेतले जाणार नाही.

4) पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पिनकोडहित पूर्ण असावा.

5) अगोदरच महापालिका सेवेत असलेल्या एखादया कर्मचा-याला वर नमूद केलेल्या पदाच्या भरतीकरिता उपस्थित रहावयाचे असेल तर त्याने/तिने त्याच्या/तिच्या खातेप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

6) अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्यांच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे.

7) अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणा-या) ए- 4 आकारातील असावे. पोस्टाने अथवा स्पीड पोस्टने प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

8) उमेदवारांनी स्वतः निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

9) उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला/ अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबत प्रमाणपत्र/व्यावसायिक अर्हता/ संबंधित गुणपत्रिका/ सक्षम अधिका-यांनी दिलेले जात प्रमाणपत्र/ सक्षम अधिका-यांनी दिलेले जात वैधतेचे प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र इत्यादी यांच्या साक्षांकित छायांकित प्रती वैयक्तिक माहितीपत्रासह (Bio- Data) जोडणे आवश्यक आहे. विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहीत महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात. उमेदवार एकापेक्षा अधिक प्रयत्नांत उच्च माध्यमिक शालांत परिक्षा आणि किरणोत्सार तंत्रज्ञ विषयक पदविका उत्तीर्ण झाला असल्यास सर्व प्रयत्नांच्या गुणपत्रिका सोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा, त्या उमेदवाराचा निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

10) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरूपाच्या गुन्हयात शिक्षा झाली असल्यास तो/ ती निवडीसाठी अपात्र ठरेल. उमेदवारांविरूद्ध पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

11) निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या 1 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) बंधपत्र (Surety Bond) सादर करावे लागेल. सदर सुरक्षित अनामत रक्कम भरूनसुद्धा महानगरपालिकेमध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परीविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास किंवा काही कारणास्तव बडतर्फ केल्यास भरलेली अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.

12) उमेदवारांना व्यवसाय चाचणीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

13) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्र/ कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

14) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत वैयक्तिक माहितीपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

15) निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक)नियम 1999 लागू होतील. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नवीन पारिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम (1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

16) सदर भरतीअंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवासातत्य उमेदवारांच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

17) निवड झालेल्या उमेदवारांविरूद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

18) उमेदवारांची निवड झाल्यास नियुक्तीनंतर निवासस्थान देण्याची जबाबदारी महापालिकेची राहणार नाही.

19) उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

20) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराचा आरक्षित पदांकरिता विचार केला जाणार नाही.

21) टपालाद्वारे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत अर्ज स्विकारण्याच्या ठिकाणी प्राप्त झाले नाहीत किंवा उशिरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

22) पोस्टाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर राहणार नाही.

23) महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासनविभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र. बीसीसी/ 2011/ प्रक्र/1064/ 11/16 ब दिनांक- 12.12.2011 नुसार मागासवर्गीयांच्या आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांनी त्याचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे.

विशेष सूचना :

1) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले /प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्वीकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही.
2) सेवायोजन कार्यालय/ प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनीदेखील या जाहिरातीनुसार आवश्यक त्या मूळ/ साक्षांकित प्रतींसह / वैयक्तिक माहितीसह हजर राहणे आवश्यक आहे.
3) जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तिंची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल व त्यांच्याविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
4) मध्यस्थ/ ठक/ मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.
5) प्रशासकीय किंवा अन्य कारणाकरिता भरती प्रक्रिया कोणत्याही क्षणी किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
6) निवड समितीने तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहीरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत या दोन्हीपैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवड सूची व्यपगत होईल.

सही /-
अधिष्ठाता
टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय

मुंबई
दिनांक – **25.04.2017**

# बृहन्मुंबई महानगरपालिका
# अर्जाचा नमुना

पदाचे नाव : `किरणोत्सार सहाय्यक’

उमेदवाराचे
छायाचित्र

प्रति,

मा. अधिष्ठाता,
बा.य.ल. रूग्णालय व टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय
डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल,
मुंबई 400008

1) पदाचे नाव :- ---------------------------------------------------------------------------------

2) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) (मराठीत) -------------------------------------------------

(ब) वडिलांचे नाव/ पतीचे संपूर्ण नाव ----------------------------------------------------------

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव ( महिलांकरिता) ------------------------------------------------

3) पत्ता :- ------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

4) (अ) मोबाईल क्रमांक – (ब) ई मेल आयडी-

(क) लिंग:- पुरूष स्त्री

5) (अ) जात ------------------------------------------- पोटजात ------------------------------------

प्रवर्ग------------------------------------------

(ब) जात वैधता प्रमाणपत्र : आहे / नाही.

6) (अ) जन्म दिनांक : - दिनांक महिना वर्ष

(ब) दिनांक- ---------------रोजी असलेले वय ---------- वर्ष ---------- महिने ---------- दिवस

7) * <u>शैक्षणिक अर्हता :-</u>

| शैक्षणिक अर्हता | विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | होय / नाही | | उमेदवार किती प्रयत्नांत परीक्षा उत्तीर्ण झाला. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त | पैकी | टक्केवारी | | | |
| माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C) | | | | | मराठी विषय उत्तीर्ण आहे का ? | | |
| उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (H.S.C.) | | | | | भौतिकशास्त्र विषय घेतला आहे का ? | | |
| किरणोत्सार तंत्रज्ञान विषयक दोन वर्षाची पदविका (Diploma in Radiation Techniques) विषयक पदविका | | | | | | | |

8) संगणकविषयक ज्ञान :- MSCIT किंवा शासनाने विहीत केलेल्या : आहे / नाही
संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र

9) अनुभव :- वर्षे -------------------------------------------------

10) लिनियर एक्सिलेटर या मशिनवर काम केल्याचा अनुभव --------------------------------------------

कोबाल्ट टेलिथेरपी या मशिनवर काम केल्याचा अनुभव --------------------------------------------

11) स्थानिक पोलीस ठाण्याचा संपूर्ण पत्ता :- -----------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------

12) सेवायोजन कार्यालयाचे नोंदणीपत्र असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक, नूतनीकरणाचा दिनांक :-
----------------------------------------------------------------------------------------------------

13) (अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? ---------------------------------------------------

(ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडावी.

14) (अ) उमेदवाराविरूद्ध पोलीस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का?
---------------------------------------------------------------------------------------------

(24) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा.
-----------------------------------------------------------------------------------------

15) (अ) सध्या अर्जदारास इतरत्र नोकरी आहे का ?

(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन सध्याच्या नियुक्तीचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडावे.

16) (अ) उंची------------फूट ---------- इंच ------------ , वजन--------------कि.ग्रॅ.,

शरीराची ठेवण :किरकोळ / मध्यम/ सुदृढ

वर्ण : --------------------- नेत्रवर्ण ----------------------- वैयक्तिक खूण ----------------------

(ब) सध्या अर्जदार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत आहे का ? आहे / नाही.

(क) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा.
---------------------------------------------------------------------------------------------

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक जाहिर करतो/ करते की वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतून कमी केल्यास त्याबाबत माझी तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरूद्ध कायदेशीर कारवाई करेल याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासू

दिनांक:
ठिकाण:

अर्जदाराची सही/-
(अर्जदाराचे नाव)